# ट्रकच्या धडकेत दुचाकीवरील तीन युवक ठार

**नववर्षाच्या दिवशीच काळाचा घाला | परतवाडा हद्दीतील धारणी रोड स्थित मल्हारा गावाजवळील घटना**





**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर/परतवाडा,( दि. 1 )** – नववर्षानिमीत्त मेळघाटच्या पायथ्याशी असणाऱ्या बुरडघाट येथील राजमहल नामक हॉटेलची सजावट पाहण्यासाठी गेलेल्या तरुणांच्या दुचाकीला आशयर ट्रकने धडक दिली. या अपघातात तिघांचा मृत्यू झाला. विवेक नरेंद्र कडू (21, रा. रामनगर, कांडली), विक्रम महेंद्रसिंग चव्हाण (15, रा. वनश्री कॉलनी, कांडली परतवाडा) व कुणाल राजेश नांदगावकर (21 रा. एकता नगर, कांडली, परतवाडा) अशी मृतांची नावे आहेत. ही घटना 31 डिसेंबर रोजी रात्री 10.30 ते 11 वाजताच्या दरम्यान घडली. या घटनेमुळे ग्रामिण भागातील नववर्षाच्या स्वागताला गालबोट लागले आहे.

कांडली राधाकृष्ण निवासी करण संजय गोंडोळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शाईन दुचाकीने प्रतीक खाजदेव, भूषण नेतनराव, करण गोंडोळे हे तिघे, तर दुसऱ्या यामाहा दुचाकीवर विवेक कडू, विक्रम चव्हाण, कुणाल राजेश



नांदगांवकर असे सहा जण दोन दुचाकीने 31 डिसेंबर निमित्त मेळघाटच्या पायथ्याशी असणाऱ्या राजमहल नामक हॉटेलवरची थर्टी फस्टची सजावट व रोषनाई पाहून, तेथून ते रात्री 10.30 वाजताच्या सुमारास दुचाकीने परत गावी निघाले होते. त्यावेळी विवेक कडू हा दोघांना घेऊन यामाहा दुचाकी चालवित होता. तर दुसऱ्या दुचाकीवर त्याचे तीन मित्र होते. दरम्यानच विरुध्द दिशेने धारणीकडून येणाऱ्या आयशर सहा चाकी ट्रक (क्रमांक एमएच 27 बिएक्स 9291) ने विवेक कडू यांच्या दुचाकी धारणी रोडवरील मल्हारा गावाजवळ असणाऱ्या श्रीकृष्ण मंदिराजवळील आरटीओ चौकात धडक दिली. या अपघातानंतर दुसऱ्या दुचाकीवरील तिघांनी तत्काळ रूग्णवाहीकेला फोन करुन बोलावून घेतले आणि जखमी तीन युवकांना रुग्णालयात नेले. त्यावेळी दोघांनाही डॉक्टरांनी मृत घोषित केले, तर एकाला उपचाराकरीता अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात रेफर करण्यात आले. परंतू त्याचाही मार्गातच मृत्यू झाला. उपजिल्हा रुग्णालयात तिघांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या पार्थिवाला नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. त्यांच्या पार्थिवावर 1 जानेवारी 2025 रोजी कांडली परिसरातील मोक्षधाम येथे अंत्यसस्कार करण्यात आले. काही दिवसापुर्वी बुरडघाट नजीकच दोन दुचाकी एकमेकांवर आदळल्याने झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यु झाला होता.

## चालकाविरुध्द गुन्हा दाखल

या घटनेनंतर परतवाडा पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. रुग्णालयात जाऊन चौकशी केली. त्यानंतर या घटनेच्या अनुषंगाने आरोपी ट्रक चालक रितेश हरिदास आवारे (रा. कांडली) याच्याविरुध्द बीएनएसची कलम 281, 106 (1), 125 (बी) नुसार गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास ठाणेदार सुरेश म्हस्के यांच्या मार्गदर्शनात पीएसआय दिलीप गिरी राहुल खांडेकर, मदतनीस अमोल घुले तपास करीत आहे.

## कौटूंबिक परिस्थिती हलाकीची

कांडली गावातील राम नगर निवासी असलेला विवेक कडू हा इंडियन गॅस एजेंसीचे सिलेंडर पोहोचविण्याचे काम करत होता. मिळालेल्या माहितीनुसार तो एकुलता एक मुलगा होता. तर विक्रम चव्हाणला वडिल नव्हते, त्याचे पालन पोषण आई करीत असे. तर कुणालचे वडिल सुतार काम करतात. त्यामुळे तिघेही हे हालाक्याच्या परिस्थितीतील असून, त्यांच्या मृत्यूमुळे कुटुंबीयांवर दुखांचे डोंगरच कोसळले आहे. या घटनेमुळे जिल्हाभरात हळहळ व्यक्त होत आहे.

# अवैध दारू विक्रीच्या वादातून तरुणाची हत्या




**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, ( दि.1 )** – गावातील अवैध दारू विक्रीच्या वादातून एका तरुणाची हत्या झाल्याची घटना 31 डिसेंबरच्या रात्री घडली. सनी दशरथ भीमसागर (वय 23 वर्षे) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला असून, पोलिस त्याचा शोध घेत आहे.

अचलपूर तालुक्यातील शिंदी बु. गावातील पोही रोडवरील अतिक्रमित जागेवर झोपड्या बांधून गावातील काही तरुणांनी खुलेआम अवैध दारूविक्रीचा व्यवसाय सुरु केला होता. त्यामुळे याबाबत या परिसरातील डब्ल्यू.के. एल इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचे प्रशासन आणि पालकांनी काही दिवसांपूर्वी पथ्रोट पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती, मात्र पोलिसांकडून कोणतीही दखल घेतल्या गेली नाही. अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे. दरम्यान याच वादातून अभिजीत मात्रे नामक तरुणासह त्याच्या चार मित्रांचा सनीच्या वडिलांशी वाद झाला. त्यानंतर घरासमोर उभ्या असलेल्या अभिजीत मात्रे यांनी सनीवर तलवारीने हल्ला केला. त्यामुळे सनी रक्ताच्या थारोळ्यात खाली पडला, या हल्ल्यात सनी गंभीर जखमी झाला. यानंतर हल्लेखोर तेथून पळून गेले. या घटनेच्या माहितीवरून कुटुंबीय रक्तबंबाळ अवस्थेत सनीला पथ्रोट येथील शासकीय रुग्णालयात नेले. मात्र जास्त रक्तस्त्राव झाल्याने सनीचा मृत्यू झाला. सनीला रुग्णालयात नेले असता, डॉक्टरांनी सनीला मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच पथ्रोट पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह रुग्णालयात नेला. त्यानंतर मृत सनीच्या वडिलांच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यालय कार्यकारी अभियंता**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर**

ई-मेल पत्ता :- achapur.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :- ०७२२३ २२०२६०

**निविदा सुचना क्रमांक ६९/निली/२०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर दुरध्वनी क्रमांक ७२२३ २२०२६० हे राज्यपाल, महाराष्ट्र शासन ह्यांच्या वतीने खालील कामांचे ब-१ नमुन्यातील ऑफलाईन निविदा सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागवित आहे. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahapwd.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | हरिसाल येथे मुख्य रस्ता ते अंगनवाडी पर्यंत पेव्हिंग ब्लॉक रस्ता बांधकाम करणे. ता. धारणी जि. अमरावती | ८४३०७३.०० |
| २ | मौजे नरवाटी येथे संजू धाडे ते कैलास मावस्कर यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता व नाली बांधकाम करणे, ता. धारणी जि. अमरावती. | ८३९४६३.०० |
| ३ | मौजे गंभेरी येथे कमल दारसिंभे यांचे घरापासुन ते सार्वजनिक विहीरीपर्यंत कॉंक्रिट रस्ता बांधकाम करणे. ता. धारणी जि. अमरावती | ८४०५६७.०० |
| ४ | मौजे गंभेरी येथे बालकराम रूपला ते कमल दारसिंभे यांच्या घरापर्यंत कॉंक्रिट रस्ता बांधकाम करणे. ता. धारणी जि. अमरावती | ८४०५६७.०० |
| ५ | मौजे दबक येथे दिलीप इंगोले ते दिलीप मनिराम यांचे घरापर्यंत कॉंक्रिट रस्ता बांधकाम करणे. ता.धारणी जि. अमरावती | ८४१४०२.०० |
| ६ | मौजे दबक येथे कब्रस्थान जगेवर पेव्हिंग ब्लॉक रस्ता बांधकाम करणे. ता. धारणी जि. अमरावती. | ७४०३८१.०० |
| १ | ऑफलाईन निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि.०३.०१.२०२५ @ १०.०० वाजता ते ०९.०१.२०२५ @ १७.०० वाजता |
| २ | निविदा पुर्व बैठक स्थळ, दिनांक व वेळ | निरंक |
| ३ | निविदाकारांनी ऑफलाईन निविदा तयार करण्यासाठी ( तांत्रिक व आर्थिक निविदा) निविदेची हार्ड कॉपी सादर करण्याचा ठिकाण, दिनांक व वेळ | ऑफलाईन निविदा बाबतची हार्ड कॉपी (तांत्रिक लिफाफा) सीलबंद लिफाफ्यामध्ये दि.१३.०१.२०२५ @ १७.०० वाजतापर्यंत निवीदेनुसार कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. |
| ४ | ऑफलाईन तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर यांचे कार्यालयात दि. १४.०१.२०२५ @ १०.०० @ वाजेपर्यंत ऑफलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

खालील संकेतस्थळावर ऑफलाईन-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे

१) http://mahapwd.gov.in

(सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र. /निली./२०२४-२०२५/दि. ३१/१२/२०२४

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर

**( प्रमोद बा. वानखडे )**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकम विभाग, अचलपूर**

**जिमाका/अम./जाहि./१४३/२०२५**


# अवैध गौण खनिज चोरी करणारे ट्रॅक्टर नागरिकांसाठी जीवघेणे



**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे,( दि.1 )**– मुरमाची चोरटी वाहतुक करणारे ट्रॅक्टर सकाळी फिरणाऱ्या नागरिकांसाठी ठरत आहे. अवैध गौण खनिजाचीही राजरोसपणे चोरी होत आहे. मात्र महसूल व पोलीस प्रशासन कुंभकर्णी झोपेत दिसत आहे.

प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तालुक्यातील खाणीतून रात्रीपासून ते सकाळपर्यंत अवैध मुरूम चोरी होत आहे. जास्तीत जास्त फेऱ्या मारण्यासाठी ट्रॅक्टर व ट्रक चालक भरधाव वेगाने वाहने चालवितात. त्यामुळे मॉर्निंग वॉकसाठी जाणारे नागरिक व व शिकवणी वर्गाला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात आला आहे. प्रशासन अधिकाऱ्यांच्या निष्काळजी पणामूळे परिणाम भविष्यात शहरातील नागरिकांना व शिकवणी वर्गात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना भोगावा लागू शकतो. तालुक्यातील काही खाणींमधून मध्यरात्रीपासून सकाळपर्यंत अवैधरित्या मुरूम चोरीला जात असून, यामुळे तालुक्यातील खाणी दिवसेंदिवस गायब होत असून, पर्यावरणाचीही हानी होत आहे, तसेच प्रशासनाच ही महसूल बुडत आहे.

गौण खनिजाची चोरटी वाहतूक करणारे ट्रॅक्टर, ट्रक चालक शहराच्या बायपासवरून भरधाव वेगाने वाहने चालवितात. या बाबीकडे वेळीस लक्ष न दिल्या भविष्यात मोठ्या अपघाताची घटना टाळता येणार नाही.

### महिला अधिकाऱ्यांमूळे अंकुश नाही

चांदुर मध्ये महसूलच्या मुख्य कार्यालयात महत्वाच्या पदावर महिला अधिकारी असल्याने चोरावर कारवाई होत नाही. हा शहरातसह तालुक्यात चर्चेचा विषय बनला आहे.

# पोलिसांवरील कामाचा ताण कमी करण्याचा प्रयत्न

**नविन वर्षात अमंलात येणार नेल्सन कार्यप्रणाली**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 1 )** – अमरावती ग्रामिण पोलीस घटकात नविन वर्षात अमंलात येणार नेल्सन कार्यप्रणाली मनुष्यबळाचे नियोजन व कामाचे नियोजनाव्दारे अधिकारी व अमंलदार यांचेवरील कामाचा ताण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

अलीकडचे काळात पोलीस दलात दाखल होणारे बहुतांश नवप्रविष्ठ पोलीस शिपाई हे पदविधर असतांत तसेच त्यांना संगणकाचे, टायपिंगचे, इंग्रजी व मराठी पत्रव्यवहाराचे पुरेपुर ज्ञान असल्याचे निर्दशनास आले आहे. त्याचा फायदा पोलीस विभागास व्हाव जेणेकरून मनुष्यबळावर येणारा ताण सुध्दा कमी करता येणे शक्य होईल. अमरावती ग्रामिण पोलीस घटकात 1 जानेवारी 2025 पासुन नेल्सन कार्यप्रणाली अमंलात येणार आहे. पोलीस विभागात प्रामुख्याने पोलिस ठाण्याला बरेच पोलीस अधिकारी व



अमंलदार हे पोलिस ठाण्याअंतर्गत येणार्या कोणत्याच बिटमध्ये कर्तव्याकरिता नेमलेले नसल्याचे तसेच त्यांचेकडे पोलिस ठाण्यातील कोणतेही महत्वाचे स्वतंत्र्य कामकाज सुध्दा नाही. अश्या पोलीस अधिकारी व अमंलदार यांना तपासपध्दती, अचानक उद्धवलेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थीती हाताळण्याचे कौशल्य, तसेच जनसंपर्क ई. कामकाजाचे अनुभव येत नाही, ज्यामुळे वेळेप्रसंगी आलेल्या परिस्थतीत सामोरे जातांना गोंधळ निर्माण होते आणि पोलिस ठाण्यातील कामकाजास विलंब होतो तसेच अन्य पोलीस अधिकारी व अमंलदार यांचेवर अतीरीक्त कामकाजाचा ताण पडतो. त्यामुळे पोलिस ठाण्यातील गुन्हे व अर्ज प्रलंबित असण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे यापुढे अमरवती ग्रामिण पोलीस घटकातील सर्व पोलिस ठाण्यात महत्वाचे (उदा. क्राईम रायटर, खुपीया, बारनिशी, हेडमोहरर, बारनिशी ई.) कामकाज पाहणारे पोलीस अमंलदार खेरीज इतर सर्व पोलीस अधिकारी व अमंलदार यांना पोलिस ठाण्याअतर्गत येणार्या बिटमध्ये नेमण्याकरिता व त्यांचेकडे बिटमधील तपास, अर्ज चौकश्या ई. कामकाज सोपविणे हे प्रामुख्याने नेल्सन कार्यप्रणालीमध्ये अर्तभुत राहणार आहे. सदर प्रणाली कार्यान्वीत करण्याची संकल्पना पोलीस अधिक्षक, विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत यांची असुन सदर संकल्पना यशस्वी करण्याकरिता अमरावती ग्रामिण घटकातील सर्व पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांना सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.

# आता पारा घसरला, वाढली थंडी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.1 )**- गेले दहा-बारा दिवस सरासरीपेक्षा मोठ्या फरकाने वाढलेले किमान तापमान आता घसरायला लागले आहे. बुधवारी अमरावती किमान तापमानात 1.1 अंशाची घसरण होत पारा 15.7 अंशावर खाली आला. अद्याप तापमान सरासरीपेक्षा वर असले तरी वातावरणात गारवा जाणवायला लागला आहे.

डिसेंबरच्या 19 तारखेपासून वढलेला पारा पुन्हा खाली उतरला नाही. 19 डिसेंबरच्या रात्री पारा 9.2 अंशावर होता आणि 24 तासात ढगाळ वातावरणामुळे तो 6.9 अंशाने चढला व 16.1 अंशाची नोंद झाली. 22 तारखेला तापमान 11.8 अंशावर आले खरे पण त्यानंतर ढगांची गर्दी आणि पावसाच्या शक्यतेने तापमान वाढत गेले. थर्टी फर्स्टच्या रात्री तापमान 16.4 अंश नोंदविण्यात आले. 1 जानेवारीला त्यात 2.1 अंशाची घसरण होत 14.3 अंशाची नोंद झाली. डिसेंबर महिन्यात अमरावतीकरांनी 10 ते 19 तारखेपर्यंत केवळ 10 दिवस थंडीचा अनुभव घेतला. या काळात तापमान 10 अंशाच्या खाली होते. 15 डिसेंबरला सर्वात कमी 7 अंशाची नोंद झाली होती.

## दशकात 2019 मध्ये सर्वात कमी तापमान

जानेवारी महिन्यातील वातावरण डिसेंबरसारखेच असते व थंडीची जाणीव होत राहते. कधीकधी तापमान 4.5 ते 6.5 अंशाच्या दरम्यान जाते व थंडीच्या लाटेचाही सामना करावा लागतो. शतकात 7 जानेवारी 1937 रोजी अमरावतीला सर्वात कमी 3.9 अंश तापमानाची नोंद झाली होती. गेल्या दशकभरात 2019 च्या 30 जानेवारीला सर्वात कमी 4.6 अंश तापमानाची नोंद झाली होती.

### पुढचे काही दिवस सौम्य थंडीचा अंदाज

**डिसेंबर महिन्यात केवळ 10 दिवस थंडीचा अनुभव.**

सध्या जम्मू काश्मीर ते उत्तर भारतापर्यंत कडाक्याची थंडी पडत आहे. मात्र वाऱ्याची दिशा विपरित असल्याने त्याचा प्रभाव विदर्भावर पडण्याची शक्यता सध्या दिसून येत नाही. मात्र पुढचे पाच दिवस किमान व कमाल तापमान सरासरीच्या आसपास राहिल आणि गारव्याची जाणीव होत राहिल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मेळघाटातील पाच गावे महिन्याभरापासून अंधारात

### महावितरण अधिकाऱ्यांचे हात वर

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.1 )** – मेळघाटातील दुर्गम भागातील गावे अजूनही शासनाच्या सुख,सुविधेपासून वंचित आहेत. या भागात रस्त्यांचा प्रश्न आहेच. या सोबतच विजेचासुद्धा मोठा प्रश्न आहे. या भागात नेहमीच कमी दाबाची वीज राहते. परंतु मागील एक महिन्यापासून या एकताई ग्रामपंचायत अंतर्गत पाच गावांमधील वीज बंद असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे.

मागील एक महिन्यापासून या गावाची वीज बंद आहे. त्यामुळे गावातील नागरिकांना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या गावातील सर्व उपकरणे बंद आहेत. लाईट पासून तर पीठ गिरणी संपर्काची साधने सुद्धा बंद आहेत. त्यामुळे ग्रामस्थांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. शहरात अर्धा तास वीज पुरवठा खंडीत असला की, वीज कार्यालयावर धडक देतात. या गावांमध्ये एक महिन्यापासून लाईट बंद असल्यामुळे काय हाल होत असतील याची कल्पना न केलेलीच बरी.



> “आमच्या एकताई ग्रामपंचायतमधील गावांमध्ये एका महिन्यापासून लाईट बंद आहे. सलीता, भांडुम, एकताई, सुमीता, खुटिदा या गावामध्ये एका महिन्यापासून लाईट बंद आहे, आमच्याकडे दुर्लक्ष होत आहे.
>
> **बाली लालाजी धिकार,**
> **सरपंच एकताई.**

### कमी दाबामूळे होत आहे बिघाड

येथील कमी दाबामूळे वीज पुरवठा होत नाही. त्यामूळे वारंवार बिघाड होत आहे. आज सायकांळ पर्यंत किंवा उद्यापर्यंत आम्ही चालु हा वीज पुरवठा सुरु करण्याचा प्रयत्न करत आहोत. तसेच जारिदा सब स्टेशन चालु होणे गरजेचे आहे. त्याशिवाय इकडच्या समस्या सुटणार नाही अशी माहिती एका महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिली.

### या पाच गावांमध्ये आहे अंधार

लाईट बंद असलेली गावे एकताई सलिता, सुमीता, खूटीदा, भांडुम इत्यादी गावांमध्ये मागील एक महिन्यापासून वीज बंद आहे.

# दंडाच्या भितीने नाही, तर स्वयंस्फूर्तीने वाहतुकीचे नियम पाळा!



### रस्ता सुरक्षा अभियानाचे उद्घाटन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.1 )**– वाहतुकीच्या नियमाचे उल्लंघन झाल्यावर तुम्हाला दंड होतो, तुम्ही दंड भरून मोकळे होता, परंतू दंडाच्या भितीने नाही, तर स्वयंम स्फूर्तीने वाहतुकीच्या नियमाचे पालन करा, जेणेकरून अपघाताच्या घटनावर आपोआपच आळा बसेल. असे आवाहन प्रभारी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रमोद घाटोळ यांनी केले. ते बुधवारी 1 जानेवारी रोजी रस्ता सुरक्षा अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

घाटोळ पुढे म्हणाले की, मानवी चुकीने होणाऱ्या अपघातानंतर त्यांच्या कुटुंबावर कोसळणाऱ्या संकटाला सामोरे जाताना भोगावे लागणारे परिणाम हे सर्वसामान्यांना माहित आहे. त्यामूळे निदान आपल्या कुटूंबाचा विचार करुन तरी आपण वाहतूकीच्या नियमाचे पालन करावे असेही ते म्हणाले. महिनाभर राबविण्यात येणाऱ्या रस्ता सुरक्षा अभियान हा संपूर्ण वर्षभर राबविण्यात येतो व वाहन चालकांना वेळोवेळी वाहतुकीच्या नियमाची माहिती देण्यात येते, जेणेकरून अपघाताच्या वाढत्या संख्येला आळा घालता येईल ही या मागची मुख्य भूमिका होय असे प्रमोद घाटोळ प्रभारी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधीकारी यांनी प्रतिपादन केले.



रस्ता सुरक्षा अभियान 2025 निमित्य प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या शिकाऊ अनुज्ञप्ती सभागृहात मोटर वाहन निरीक्षक प्रमोद सरोदे, गोरखनाथ शेलार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाकरिता अधिकारी, कर्मचारी व शिकाऊ अनुज्ञप्तीधारक आणि वाहन चालक उपस्थित होते. मोटार वाहन निरीक्षक सागर ठोसरे यांनी वाहन चालकांना प्रतिज्ञा दिली. याप्रसंगी विजय गावंडे कर वसुली अधिकारी, सतीश राठोड, ऋषिकेश गावंडे, सागर ठोसरे, गणेश शिरगिरे, शिवशंकर कातडे, अमोल बोरे, दीक्षा आढाव, शोहेब शेख, राहुल सरकटे, सचिन बडगे, प्रमोद राजनेकर, नितेश चुलेट, देवानंद खंडारे, संगीता भिलावेकर, मिनल गिरे आदी कर्मचारी, अधिकारी व वाहन चालक प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन अनिल मानकर जनसंपर्क अधिकारी यांनी तर आभार प्रदर्शन कांचन जाधव सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक यांनी केले.

### विवाहीतेच्या आत्महत्येप्रकरणी सैनिकासह तिघांवर गुन्हे

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगांव सुजी, ( दि.1 )**– अंजनगांव सुर्जी परिसरातील द्वारका चौक येथील रहिवाशी असलेल्या एका विवाहित महिलेने शनिवारी (दि.28) रात्री आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली होती. याप्रकरणी पोलिसांनी सैन्यात असलेल्या पतीसह तिघांविरुध्द गुन्हे दाखल केले. या प्रकरणाचा पुढिल तपास अंजनगांव सुर्जी पोलीस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शना पोलीस कर्मचारी करीत आहे.

# विश्वास दामले आजच्या मुलाचे शांताक्लॉज

## विषयतज्ञ विवेक राऊत; लिटिल स्टार शाळेचे स्नेहसंमेलन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे, ( दि.1 )**– नाताळाचा सण आला की प्रत्येक लहान मुलांना आठवतात ते सांताक्लॉज, सांताक्लॉज नाताळाला लहान मुलांना खेळणी, चॉकलेट वाटतात तसेच लिटिल स्टार इंग्लिश शाळेचे संस्थापक व मुख्याध्यापक राहिलेले विश्वास दामले सर हे आजच्या मुलांचे आधुनिक सांताक्लॉजच असल्याचे मत विषयतज्ज्ञ विवेक राऊत यांनी मांडले.

लिटिल स्टार इंग्लिश शाळेच्या स्नेहसम्मेलनाच्या बक्षीस समारंभ कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते, यावेळी मंचावर माजी सभापती अविनाश मार्डीकर, शाळेचे संस्थापक विश्वास दामले मुख्याध्यापक अतुल दामले उपस्थित होते, चांदुर रेल्वे तालुक्यातील पहिली इंग्लिश शाळा म्हणून आजही नावलौकिक मिळवीत आहे आजच्या इंग्लिश शाळेच्या व्यापारिकरणात व स्पर्धेच्या काळात सर्वसामान्यांन कुटुंबांना आपल्या पाल्यांना इंग्लिश शाळेत शिकविण्याचे स्वप्न याच शाळेच्या माध्यमातून पूर्ण करता येत असल्याचे विवेक राऊत यांनी यावेळी उपस्थित पालकांना सांगितले. यावेळी शाळेत झालेल्या विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत विजयी व सहभागी विद्यार्थ्यांना अविनाश मार्डीकर व विवेक राऊत यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात आपल्या कलेचे प्रदर्शन यावेळी केले. पाहुण्यांचे उपस्थितांचे स्वागत– अतूल. वि. दामले, वर्षा अ.दामले यांनी केले तर. वैष्णवी देशमुख, आकांक्षा चौधरी यांनी कार्यक्रमाचे संचलन केले तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे संचलन शिक्षिका जुमडे व उठाने यांनी केले, आभार प्रदर्शन शिक्षिका सोनगडे यांनी केले.




# अतिवृष्टी,गारपीट चे अनुदान तत्काळ द्या!



- अन्यथा उच्च न्यायालयात याचिका
- किसान न्याय हक्क संघर्ष समितीचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**


**वरूड, ( दि.1 )** – तालुक्यात सन 2023 मधे अतिवृष्टी झाली शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले व शासनाने अतिवृष्टी जाहीर केली व हेक्टरी अनुदान जाहीर केले. त्यामध्ये शेतकऱ्यांना तीन हेक्टर पर्यंतचे मर्यादित अनुदान जाहीर केले, परंतु प्रशासनाचे दिरंगाई मुळे काही शेतकऱ्यांना अतिवृष्टी अनुदान आज पर्यंत एवढ मोठे कालावधी होऊन सुद्धा आज पर्यंत अनुदान प्राप्त झाले नाही. त्यानंतर एप्रिल 2024 मध्ये वरूड तालुक्यात गारपीट झाली, त्या वेळी शेतकऱ्यांचे नुकसान झाले. शासनाने गारपीटकरीता अनुदान जाहीर केले, परंतु त्यामध्ये प्रशासनाचे चुकीने पन्नास हजारावर मिळणारे अनुदान अडकले आहे. कारण प्रशासनाने अतिवृष्टी व गारपीट हे एकच आर्थिक वर्षात टाकले. त्यामुळे शेतकऱ्यांना गारपीटचे अनुदान मिळणार नाही, असे संकेत प्रशासनातील काही अधिकारी यांनी दिले आहे. त्या मुळे आता अतिवृष्टीचे शिल्लक पात्र 4414 शेतकरी असून त्यांचे 11 कोटी 55 लाख 38 हजार 707 रुपये व सन 2024 गारपीट चे पात्र शेतकरी 1083 असून त्याची रक्कम 34 कोटी 24 लाख 6 हजार 612 रुपये देणे बाकी आहे. परंतु ही रक्कम मिळणार की नाही, हे आज निश्चित दिसत नाही. शेतकरी रोज तहसील कार्यालयात हेलपाटे मारत आहे, मात्र तहसील प्रशासन काही दिवसात येणार असल्याचे सांगत वेळ मारुन नेत आहे. त्यासाठी आता शेतकरी न्याय हक्क समितीने जिल्हाधिकारी, तहसीलदार व राज्य सरकारला निवेदन देऊन या वर तोडगा काढून सर्व पात्र उर्वरित शेतकऱ्यानं अतिवृष्टी व गारपीट चे अनुदान द्या असे निवेदन शेतकरी न्याय हक्क संघर्ष समितीचे पदाधिकारी सप्नील खांडेकर तृषार निकम, नरेंद्र उर्फ बबलू पावडे, सुधाकरराव दोड, बाबाराव मंगुळकर, मोहन खुजेसह सर्व पदाधिकारी हजर होते.

### आठ दिवसांचा अल्टीमेटम

निवेदन देते वेळी शेतकरी न्याय हक्क संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, आता शेतकऱ्यांचा अंत पाहू नका, खूप दिवस झाले, आम्हा शेतकऱ्यांना आपण दिशाभूल करत आहे. आता आठ दिवसात आम्हाला जर शेतकऱ्यांना अतिवृष्टी व गारपीट चे अनुदान दिले नाही, तर आता उच्च न्यायालयात याचिका दाखल करू असा इशारा शासन व प्रशासनाला दिला आहे.

# गेल्या वर्षभरात 3989 गुन्हे दाखल

## पोलिस आयुक्तांनी मांडला 2024 चा लेखाजोखा



*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती,( दि.1 ) – गेल्या वर्षभरात गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न चालले. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा गुन्ह्यांची संख्या कमी झाली आहे. 2024 मध्ये लोकसभा व विधानसभा निवडणूकीसह सण–उत्सवात पोलिसांनी योग्यरित्या कायदा व व्यवस्था अबाधित ठेवण्याची पोलिसांनी जबाबदारी सांभाळली. सायबर गुन्हेगारीसह अनेक ब्लॉईड प्रकरणे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश मिळाले. गुन्हेगारांवर वचक बसावी, याकरिता प्रतिबंधात्मक, तडिपारी व एमपीडीए सारख्या कारवाया करण्यात आल्या. अशा वर्षभरात अमरावती शहरात एकुण 4830 गुन्हे दाखल झाले आहेत. परंतू गेल्या वर्षीच्या तुलनेत हे गुन्हे यंदा कमी आहे. यासोबत दोषसिध्दीचेही प्रमाण वाढले. अशी माहिती पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी मंगळवारी वर्षअखेरचा लेखाजोखा मांडताना दिली.*

### चायना मांजावर तीव्र कारवाई

येत्या काही दिवसांत मकर संक्रांतीचा सण येत आहे. पतंगबाजीत वापरण्यात येणारा चायना मांजा मानव, प्राणी, पक्षी आणि पर्यावरणासाठी धोकादायक आहे. त्यामुळे सरकारने चायना मांजावर बंदी घातली आहे. या अनुषंगाने पोलीस विभागाने या वर्षात चायना मांजा विक्रेत्यांवर एकूण 12 कारवाई केली असून 12 जणांवर गुन्हा दाखल केला आहे. कारवाईत पोलिसांनी 2 लाख 73 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### 18 गुन्हेगारांवर एमपीडीए

शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या कुख्यात गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी एमपीडीएची कारवाई करण्यात येते. ज्या अंतर्गत शहरात अशांतता निर्माण करणाऱ्या आणि प्रतिबंधात्मक कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या 18 आरोपींवर एमपीडीएची कारवाई करण्यात आली आहे.

### 7 प्रकरणांमध्ये 14 आरोपींना जन्मठेप

यावर्षी एकूण 46 न्यायालयीन प्रकरणांमध्ये दोषसिध्द झाले आहेत. ज्यामध्ये 7 प्रकरणांमध्ये 14 आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. 6 प्रकरणांमध्ये न्यायालयाने आरोपींना 7 वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

### 16 बंदुक जप्त

अवैधरित्या बंदुक बाळगणाऱ्यांवर एकूण 16 कारवाई करण्यात आली आहे. ज्यामध्ये 40 आरोपींना अटक करण्यात आली आहे. जप्त केलेल्या मालाची किंमत 2 लाख 46 हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे.

### 55 गुन्ह्यांमध्ये 214 किलो गांजा जप्त

पोलिस विभागानेही अमली पदार्थांचे सेवन रोखण्यासाठी मोठे प्रयत्न केले. गांजा तस्करांवर वर्षभरात एकूण 55 कारवाई करण्यात आली. ज्यामध्ये 214 किलो गांजा जप्त करण्यात आला. ज्याची किंमत 43 लाख 12 हजार रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. ज्यामध्ये 71 आरोपींना अटक करण्यात आली आहे. याशिवाय एमडीवर कारवाई करण्यात आली असून त्यात 40.20 ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले आहे. जप्त एमडीची किंमत 9 लाख 20 हजार रुपये आहे.

### हत्येच्या तीन घटना वाढल्या

गेल्या वर्षी 2023 मध्ये पोलीस आयुक्तालय परिसरात खुनाचे 29 गुन्हे दाखल झाले होते. तर 2024 या वर्षात खुनाच्या 32 गुन्ह्यांची नोंद झाली आहे. या सर्व प्रकरणात पोलिसांनी हत्येचे कारण शोधून आरोपींना अटक केली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी 3 खूनाच्या घटना अधिक झाल्या आहेत. तर 2022 मध्ये 31 खुनाची नोंद झाली आहे.


### जन्म/मृत्यू बाबत जाहीरनामा

नायब तहसीलदार (महसूल), तथा कार्यकारी दंडाधिकारी,
अचलपूर यांचे न्यायालयात

प्र.क्र. जन्म/मृत्यू नोंद क्र. ६२३/ एम.आर.सी. ८१/अचलपूर/२०२४–२०२५

अर्जदार श्री मोहम्मद वसीम शेख करीम रा. परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती यांनी मोहम्मद वसीम शेख करीम यांचा जन्म दिनांक १४/०६/१९८४ रोजी मौजा अचलपूर येथे झालेला असून त्याबाबतची नोंद नगर परिषद कार्यालय अचलपूर येथे करण्याबाबत अर्ज या न्यायालयात सादर केलेला आहे.

तरी ज्या इसमास सदर नोंद करणे बाबतीत हरकत/आक्षेप असेल तर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत हरकत/आक्षेप सादर करावा. विहीत मुदतीत आक्षेप/हरकत प्राप्त न झाल्यास संबंधितास जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल व मुदती नंतर हरकत/आक्षेप प्राप्त झाल्यास सदर हरकत/आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

दिनांक :– २६/१२/२०२४

कोर्ट शिक्का

**कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसीलदार ( महसूल ) अचलपूर**

### जन्म/मृत्यू बाबत जाहीरनामा

नायब तहसीलदार (महसूल), तथा कार्यकारी दंडाधिकारी,
अचलपूर यांचे न्यायालयात

प्र.क्र. जन्म/मृत्यू नोंद क्र. ६२५/ एम.आर.सी. ८१/अचलपूर/२०२४–२०२५

अर्जदार श्री शेख करीम शेख बशीर रा. परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती यांनी शेख करीम शेख बशीर यांचा जन्म दिनांक ०१/०७/१९५१ रोजी मौजा अचलपूर येथे झालेला असून त्याबाबतची नोंद नगर परिषद कार्यालय अचलपूर येथे करण्याबाबत अर्ज या न्यायालयात सादर केलेला आहे.

तरी ज्या इसमास सदर नोंद करणे बाबतीत हरकत/आक्षेप असेल तर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत हरकत/आक्षेप सादर करावा. विहीत मुदतीत आक्षेप/हरकत प्राप्त न झाल्यास संबंधितास जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल व मुदती नंतर हरकत/आक्षेप प्राप्त झाल्यास सदर हरकत/आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

दिनांक :– २६/१२/२०२४

कोर्ट शिक्का

**कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसीलदार ( महसूल ) अचलपूर**

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार नरेश विद्याधर गारोडी रा. अंजनगांव ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील रहीवाशी आहेत. त्यांच्या स्वताच्या जन्माची नोंद नगरपरिषद अंजनगांव येथे रजिस्टरमध्ये जन्माची नोंद नसल्याने त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माच्या नोंदीचे आदेश होण्याबाबतचा विनंती अर्ज या कार्यालयात दि. २६–०८–२०२४ रोजी सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरून जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात येत आहे. नरेश विद्याधर गारोडेकर यांचा जन्म अंजनगांव येथे ५–६–१९७६ रोजी झाला आहे. त्याबाबत कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार असल्यास किंवा प्रकरणात काही म्हणावयाचे असल्यास त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वत: अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत अन्यथा ३० दिवसानंतर जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

कोर्ट शिक्का

**( रविंद्र काळे )**
**निवासी नायब तहसीलदार**
**अंजनगांव सुर्जी**